# म.ए.स. पिल्लई आर्किटेक्चर कॉलेज, नवीन पनवेल.

| कार्यक्रमाचा प्रकार:<br>**सांस्कृतिक** | **कार्यक्रमाचे नाव:**<br>**मराठी भाषा गौरव दिवस** | **शैक्षणिक वर्ष: २०२० - २०२१** |
|---|---|---|
| | | **कार्यक्रमाची तारीख: २६ फेब्रुवारी , २०२१** |

**कार्यक्रमाचा तपशील:** *मराठी भाषा गौरव दिवस* म्हणून ओळखला जातो आणि तो महाराष्ट्र आणि गोवा या राज्यांमध्ये अत्यंत मोठ्या उत्सहात साजरा केला जातो.

**घटनास्थळ:** ऑनलाईन

**उपस्थित विद्यार्थी वर्ग:** प्रथम वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे वर्ष, चौथे वर्ष, पाचवे वर्ष

**संक्षिप्त वर्णन:**

**मराठी भाषा गौरव दिवस**, हे सांस्कृतिक कार्यक्रम २६ फेब्रुवारी रोजी पिल्लई आर्किटेक्चर कॉलेज, नवीन पनवेल मध्ये साजरा केला गेला. हे कार्यक्रम पाईका सेनेट द्वारा समन्वित केलेला होता. सरचिटणीस राऊ तांबट यांनी कार्यक्रमाचे प्रस्थावना दिली आणि श्रोत्यांना आमंत्रित केले.

पहिल्या वर्षाचा वैष्णवी घरत यांनी केलेलं भाषण थोडक्यात - आमच्या पिढीला असलेलं इंग्रजीचं आकर्षण आणि एकुणच मराठीचं असलेलं वावडं हीच सध्याची खरी शोकांतिका आहे.

दीडशे वर्षांची ब्रिटिश राजवट सहन करून सुद्धा आपल्याला मराठीचे खरे महत्त्व कळले नही. मराठी मायबोली ला खरतर इतके सुपुत्र लाभले, ज्यांनी ती घराघरात पोहचवली. मराठीचे सामर्थ्य इतके प्रचंड की नानाविध रुपात आपल्याला दिसत आली आहे. अनेक आक्रमणं झाली पण मायबोली अजूनच तेजस्वी होत राहिली. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यसंग्रामात मराठीचे शूर असे रूप दिसले.

मराठीत भाषा दिन दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी साजरा केला जातो, जो महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी श्री विष्णु वामन शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस म्हणुन साजरा केला जातो.

कुसुमाग्रज यांचा सुप्रसिद्ध काव्यसंग्रह विशाखा यातील कोलंबस चे गौरवगीत याचे वाचन प्राध्यापक कविता सावंत यांनी केले, पुढीलप्रमाणे :-

कोलंबस चे गौरवगीत या कवितेची प्रस्तावना श्री वि. स. खांडेकर यांनी लिहिली आहे. ते आपल्या भावना व्यक्त करताना असा सांगतात की कुसुमाग्रज यांच्या कवितेत सगळे सामाजिक भाव आहेत, परंतु त्या कविता दुबळ्या नाहीत, त्यामधे

एक दुर्दम्य इच्छाशक्ती आहे.

कवितेत कुसुमाग्रज हे कोलंबस याला उद्देशून म्हटले आहे की किती ही संकटे आली पण नाविक या सगळ्यातून मार्ग नक्कीच काढतील.

_

**EVENT PHOTOGRAPHS:**







Student Council activity




## ATTENDANCE










Student Council activity

Mahatma Education Society's,
Pillai College of Architecture, New Panvel,
Invites you to celebrate

# मराठी भाषा गौरव दिन

Date: 26 February 2021
Time: 06:00 PM Onwards
VENUE: Zoom Meeting

PiCA
PiCA Student Council SENATE

